PRGI/RNI: MHMAR/26/A8144

मी मराठी मंच

॥ आवाज महाराष्ट्राचा ॥

● वर्ष : ०१ ● अंक : ०७ | ● शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ ते १९ नोव्हेंबर २०२६ | ● पृष्ठ : ०८ ● किंमत : ५रु.

स्वच्छ सर्वेक्षणात नवी मुंबई देशात अव्वल; ४,७५१ शहरांना मागे टाकत प्रथम क्रमांकाचा मान

नवी मुंबई :

देशातील स्वच्छ शहरांच्या क्रमवारीत सातत्याने अग्रभागी राहणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेने यंदा स्वच्छतेच्या क्षेत्रात सर्वोच्च यश संपादन केले आहे. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये देशातील ४, ७५१ शहरांमधून नवी मुंबईने प्रथम क्रमांक पटकावत देशातील सर्वोत्कृष्ट स्वच्छ शहराचा मान मिळवला आहे. नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात बुधवारी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला. यावेळी उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यासह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



नवी मुंबई महानगरपालिकेने गेल्या तीन ते चार वर्षांपासून 'निश्चय केला, नंबर पहिला' हे ध्येय समोर ठेवून स्वच्छतेच्या कामात सातत्याने सुधारणा करण्यावर भर दिला होता. दैनंदिन स्वच्छता, कचरा संकलन, वाहतूक, कचऱ्याचे वर्गीकरण आणि त्यावर प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच नागरिकांचा सक्रिय सहभाग अशा विविध स्तरांवर राबविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे महापालिकेला हे यश मिळाले आहे. केवळ स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कामावर अवलंबून न राहता प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून शहराने देशातील प्रथम क्रमांकाचे लक्ष्य गाठले आहे.

गोकुळच्या अध्यक्षपदी महायुतीचे राजेश पाटील यांची निवड

कोल्हापूर :

कोरोनाअभावी पंधरा दिवसांपूर्वी तहकूब झालेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा पेच अखेर सोमवारी सुटला. महायुतीने अध्यक्षपदावर दावा सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेश पाटील यांना उमेदवारी दिली आणि त्यांची अध्यक्षपदी निवड झाली.सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार शशिकांत पाटील-चुयेकर यांचा



त्यांनी पराभव केला.निवडणूक प्रक्रियेत महायुतीने बाजी मारली. शासन नियुक्त चार संचालकांच्या मतदानामुळे महायुतीला विजय मिळवणे शक्य झाले. या निकालामुळे गोकुळमधील सत्तासमीकरणात महत्त्वाचा बदल झाला आहे.

नवी मुंबई-चिपी थेट विमानसेवा १६ नोव्हेंबरपासून सुरू होणार

नवी मुंबई :

कोकणवासीयांसाठी आनंदाची बातमी असून, येत्या १६ नोव्हेंबर २०२६ पासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सिंधुदुर्गच्या चिपी विमानतळासाठी थेट विमानसेवा सुरू होणार आहे. या सेवेसाठी तिकीट बुकिंगलाही अधिकृत सुरुवात झाली आहे. रीजनल एअरलाईन फ्लाय९१ (FLY९१) ही सेवा चालवणार असून, आठवड्यातील सातही दिवस विमान उड्डाण करणार आहे. यापूर्वी मुंबई-चिपी विमानसेवा काही तांत्रिक कारणांमुळे



बंद करण्यात आली होती. मात्र, नव्या सेवेच्या प्रारंभामुळे चाकरमानी, स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



महाराष्ट्रातील लाडघर, गुहागर आणि श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय 'ब्ल्यू फ्लॅग' पुरस्कार

मुंबई : महाराष्ट्राच्या शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक पर्यटनाच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळाले आहे. आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग ज्युरीने २०२६-२७ या हंगामासाठी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील लाडघर व गुहागर आणि रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन या तीन समुद्रकिनाऱ्यांना प्रथमच प्रतिष्ठेचा 'इंटरनॅशनल ब्ल्यू फ्लॅग' पुरस्कार जाहीर केला आहे. या यशामुळे महाराष्ट्राने आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग समुद्रकिनाऱ्यांच्या यादीत प्रथमच स्थान मिळवले आहे.


पर्यावरण संवर्धन, समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, जैवविविधतेचे संरक्षण, पर्यटकांची सुरक्षितता, आवश्यक पायाभूत सुविधा आणि शाश्वत पर्यटन व्यवस्थापन या आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता केल्याबद्दल



या समुद्रकिनाऱ्यांना हा सन्मान प्राप्त झाला आहे.

या महत्त्वपूर्ण यशामागे राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, पर्यटन विभाग, संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, बीच मॅनेजमेंट कमिटी तसेच स्थानिक नागरिक आणि विविध यंत्रणांचे समन्वित प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला असून, महाराष्ट्राच्या



विस्तीर्ण किनारपट्टीवरील इतर पात्र समुद्रकिनाऱ्यांचाही आंतरराष्ट्रीय दर्जानुसार विकास करण्यासाठी ब्ल्यू फ्लॅग कार्यक्रमाचा उपयोग करण्यात

महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा!

येणार आहे. यामुळे किनारपट्टीवरील पर्यावरण संरक्षणासोबतच स्थानिक रोजगार, पर्यटन व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल.

नव्याने पुरस्कारप्राप्त या तिन्ही समुद्रकिनाऱ्यांचा ब्ल्यू फ्लॅग हंगाम १५ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होणार आहे. या पुरस्काराचे प्रतीक असलेले प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग नेदरलँड्स येथून प्राप्त होत असून, ते राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. त्यानंतर संबंधित विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन आहे.

देशात २०२६-२७ हंगामासाठी एकूण २२ समुद्रकिनाऱ्यांना ब्ल्यू फ्लॅग मान्यता मिळाली असून, त्यामध्ये १३ समुद्रकिनाऱ्यांचे नूतनीकरण आणि ९ नवीन समुद्रकिनाऱ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील तीन समुद्रकिनाऱ्यांचा या नव्या यादीत समावेश होणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे.

ब्ल्यू फ्लॅग हा केवळ पुरस्कार नसून पर्यावरणपूरक विकास, स्वच्छता, सुरक्षितता आणि शाश्वत पर्यटनासाठीची आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मान्यता आहे. महाराष्ट्रातील समुद्रकिनारे जागतिक पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे आणण्यास या यशामुळे निश्चितच मदत होणार आहे.

लवकरच आंबा घाटातील प्रवासाचा कोंडमारा संपणार?



रत्नागिरी : रत्नागिरी आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या आंबा घाटातील नागमोडी वळणे, तीव्र चढ-उतार आणि धोकादायक प्रवासातून वाहनचालकांची लवकरच सुटका होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आंबा घाटाला पर्याय म्हणून भुयारी मार्ग उभारण्याच्या प्रस्तावाला आता चालना मिळाली असून, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ही माहिती दिली. हा भुयारी मार्ग प्रत्यक्षात साकारल्यास रत्नागिरी-कोल्हापूर प्रवासाचा कालावधी अवघ्या एका तासावर येण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. रत्नागिरी आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा आंबा घाट हा वाहतूक, व्यापार आणि पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, या घाटातील नागमोडी वळणे, अरुंद रस्ते, तीव्र चढ-उतार आणि लांबचा वळसा यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. विशेषतः पावसाळ्यात धुके, मुसळधार पाऊस आणि दरडी कोसळण्याच्या संभाव्य धोक्यामुळे हा मार्ग अधिकच आव्हानात्मक ठरतो. घाटातील प्रवासाचा वेळ कमी व्हावा, वाहतूक अधिक सुरक्षित व्हावी आणि कोकण-पश्चिम महाराष्ट्रातील संपर्क वेगवान व्हावा, यासाठी आंबा घाटात भुयारी मार्ग उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. याच मागणीच्या अनुषंगाने उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन या प्रकल्पाबाबत चर्चा केली. या चर्चेनंतर गडकरी यांनी भुयारी मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रस्तावाला आता प्रशासकीय पातळीवर गती मिळण्याची चिन्हे आहेत.

आमच्याशिवाय राष्ट्रवादीचे एकत्रीकरण होणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : राज्यात राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणावरून पुन्हा एकदा राजकीय चर्चेला उधाण आले आहे. मात्र, दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाबाबत काय सुरू आहे, हे केवळ संबंधित पक्षांचे अध्यक्षच सांगू शकतात. इतर नेत्यांकडून केल्या जाणाऱ्या दाव्यांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यात समान नागरी कायदा आणण्यावर आपण ठाम असल्याचे सांगतानाच विरोधकांना रस्त्यावर उतरून प्रत्युत्तर देण्याचा इशाराही त्यांनी दिला.



दिवाळसणाच्या निमित्ताने प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळ, समान नागरी कायदा, राहुल गांधी यांची घटनात्मक संस्थांबाबतची भूमिका, महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा, दिशा सालियन मृत्यू प्रकरण आणि महायुती सरकारच्या कामकाजासह विविध राजकीय विषयांवर भाष्य केले.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाची चर्चा सुरू झाली आहे. याबाबत बोलताना, दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाबाबत नेमके काय सुरू आहे, हे एकतर खासदार शरद पवार सांगू शकतील किंवा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार सांगू शकतील. हे दोन्ही नेते जे सांगतील तेच खरे आहे. बाकी नेते सांगतात त्याला काहीही अर्थ नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नेरुळ, सानपाडा स्थानकांत छटपूजेची गाणी; प्रवाशांमध्ये संभ्रम

नवी मुंबई : नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांवर बुधवारी अचानक छटपूजेसंदर्भातील भोजपुरी गाणी वाजू लागल्याने प्रवाशांमध्ये आश्चर्य आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. नेरुळ, सानपाडा यांसह काही रेल्वे स्थानकांवरील ध्वनिक्षेपकांवरून ही गाणी ऐकू येत होती. नेहमी गाड्यांचे आगमन, प्रस्थान आणि प्रवाशांसाठी आवश्यक सूचना ऐकू येणाऱ्या ध्वनिक्षेपकांवर गाणी सुरू झाल्याने प्रवाशांना हा नेमका कोणता उपक्रम आहे, असा प्रश्न पडला.

बुधवारी दुपारी नेरुळ रेल्वे स्थानकावर छटपूजेशी संबंधित भोजपुरी गाणी



वाजण्यास सुरुवात झाली. कोणतीही पूर्वसूचना नसताना गाणी सुरू झाल्याने काही प्रवाशांनी स्थानक प्रबंधक अवधेश सिंग यांच्याकडे याबाबत विचारणा केली. त्यावेळी हा उपक्रम स्थानिक स्थानक व्यवस्थापनाकडून नसून मध्य रेल्वे प्रशासनाकडून राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

छटपूजेच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांमध्ये सणाचे वातावरण निर्माण करण्यासाठी मध्य रेल्वेकडून हा उपक्रम राबविला जात असल्याचे समजते. मात्र, हा निर्णय नेमका कोणत्या स्तरावर घेण्यात आला, याबाबत स्पष्टता नाही. तसेच हा उपक्रम केवळ नेरुळ स्थानकापुरता मर्यादित आहे की अन्य स्थानकांवरही राबविण्यात येत आहे, याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

पार्थ पवारांनी सलग दुसऱ्या दिवशी घेतली शरद पवारांची भेट; राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांना पुन्हा वेग?

रुग्णालयात विलिनीकरणाची चर्चा करणे योग्य नव्हते; प्रफुल्ल पटेल यांचा खुलासा

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलिनीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर राजकीय नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी शनिवारी आणि रविवारी सलग दोन दिवस शरद पवार यांची त्यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. या भेटींमुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट पुन्हा एकत्र येणार का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी रुग्णालयात विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे.शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईतील पूना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विविध नेत्यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली आणि प्रकृतीची विचारपूस केली.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनीही रुग्णालयात जाऊन शरद पवार यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान दोन्ही पक्षांच्या विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे पटेल यांनी स्पष्ट केले. शरद पवार यांच्यासोबत अनेक वर्षे काम करण्याची संधी मिळाली असून त्यांचे आशीर्वाद नेहमीच लाभले आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आपण भेट घेतल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, शरद पवार यांच्या भेटीनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांमध्ये पुन्हा जवळीक निर्माण होत असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात वेग आला आहे. शरद पवार यांना शनिवारी (७ नोव्हेंबर) ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर ते सिल्व्हर ओक या निवासस्थानी परतले. त्याच दिवशी सायंकाळी पार्थ पवार यांनी त्यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि आमदार जितेंद्र आव्हाड उपस्थित होते. पार्थ पवार यांनी शरद पवार यांच्याशी सुमारे दीड तास चर्चा केली. विशेष म्हणजे, रविवारी (८ नोव्हेंबर) पार्थ पवार पुन्हा एकदा सिल्व्हर ओक येथे दाखल झाले. सलग दोन दिवस झालेल्या या भेटींमुळे राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना सुरुवात झाली आहे. या भेटींमध्ये नेमकी काय चर्चा झाली, याचा तपशील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांतील संभाव्य जवळिकीच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. एकीकडे प्रफुल्ल पटेल यांनी विलिनीकरणाच्या चर्चेचा इन्कार केला आहे, तर दुसरीकडे पार्थ पवार यांच्या सलग दोन भेटी आणि सुनील तटकरे यांनी विलिनीकरणाच्या चर्चांवर केलेले भाष्य यामुळे राजकीय चर्चांना नवे वळण मिळाले आहे. त्यामुळे १० नोव्हेंबरनंतर शरद पवार आणि अजित पवार यांची प्रत्यक्ष भेट होते का आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या एकत्रीकरणाबाबत काही ठोस हालचाली होतात का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी यापूर्वी दोन्ही पक्षांमध्ये विलिनीकरणाबाबत चर्चा झाल्याचे मान्य केले होते. मात्र, आता विलिनीकरणाची शक्यता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या कार्यकर्त्यांची आणि जनतेची इच्छा पक्षाने स्वतंत्र व मजबूत राहावे, अशी असल्याचे शिंदे यांनी सांगितले. अजितदादांचीही हीच इच्छा असल्याचा दावा त्यांनी केला. महाराष्ट्र अधिक मजबूत करण्यासाठी दोन्ही पक्षांनी एकत्र यावे, अशी सुरुवातीला दोन्ही बाजूंकडून तीव्र इच्छा होती. त्यामुळेच विलिनीकरणाबाबत चर्चा झाली होती. मात्र, आता विलिनीकरणाची कोणतीही शक्यता उरलेली नाही, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

बनावट 'पर्यटन तहसील कार्यालय' उभारून प्रशासनाची केळी दिशाभूल; तरुणाला अटक

नवी मुंबई : शासकीय कार्यालयाचे नाव, अधिकृत लोगो आणि बनावट शिक्क्याचा वापर करून अस्तित्वात नसलेल्या 'पर्यटन तहसील कार्यालय'च्या नावाने प्रशासकीय यंत्रणेची दिशाभूल करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या बनावट कार्यालयाचा महसूल अधिकारी असल्याचे भासवून ठाणे जिल्हाधिकारी आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तांना प्रक्षोभक आशयाची पत्रे पाठविणाऱ्या सुयश संजय शिर्के (३०) याला वाशी पोलिसांनी अटक केली आहे. कल्याणमधील दुर्गाडी किल्ला आणि रमजान ईदच्या अनुषंगाने धार्मिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असलेला मजकूर या पत्रांमध्ये होता. त्यामुळे या प्रकरणाची प्रशासनाने गंभीर दखल घेतली होती.

ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाला 'किरण कुमार' या नावाने एक संशयास्पद पत्र प्राप्त झाले होते. या पत्रावर 'सह महसूल अधिकारी, पर्यटन तहसील कार्यालय' असा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, शासनाच्या अभिलेखात अशा नावाचे कोणतेही कार्यालय अस्तित्वात नसल्याचे प्राथमिक पडताळणीत स्पष्ट झाले. त्यामुळे या पत्रामागील व्यक्तीची ओळख आणि पत्राचा उद्देश शोधण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने वाशी पोलिसांना दिले होते.

या पत्रातील मजकूरही वादग्रस्त होता. आगामी रमजान ईद तसेच मार्च ते मे या कालावधीत कल्याणमधील दुर्गाडी किल्ला आणि परिसरात मुस्लिम समाजाला नमाज पठण



करण्यास कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. याशिवाय कल्याण बंदर आणि दुर्गाडी किल्ला परिसरातील निकाल तसेच विजयोत्सवाच्या नावाखाली वाशी सेक्टर १७ मधील एका खासगी इमारतीत पत्रकार परिषद घेण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. शासकीय पदाचा आभास निर्माण करून पाठविण्यात आलेल्या या पत्रामुळे प्रशासनाची दिशाभूल होण्याबरोबरच सामाजिक वातावरण बिघडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय विभागाचे पोलीस अंमलदार संदीप ढवळे आणि त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. पत्र पाठविण्यासाठी वापरण्यात आलेल्या कुरिअर कंपनीची माहिती, नोंदी आणि परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासण्यात आले. या तपासातून वाशी सेक्टर १७ मधील एका छायांकित प्रत केंद्रातून पेनड्राइव्हच्या आधारे पत्राची छपाई करून ते कुरिअर करणाऱ्या व्यक्तीचा माग काढण्यात पोलिसांना यश आले.

एसटी प्रवाशांना ३१ डिसेंबरपर्यंत NCMC कार्डशिवाय मिळणार सवलत

मुंबई : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर गावी जाणाऱ्या आणि देवदर्शनासाठी प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना एसटी महामंडळाने मोठा दिलासा दिला आहे. प्रवास सवलतीसाठी अनिवार्य करण्यात आलेल्या NCMC (National Common Mobility Card) ची सक्ती ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत शिथिल करण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप NCMC कार्ड नोंदणी न झालेल्या पात्र प्रवाशांनाही सवलतीच्या दरात एसटी प्रवास करता येणार आहे. राज्य सरकारकडून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि इतर विविध सामाजिक घटकांना एसटी तिकिटांमध्ये सवलत दिली जाते. या सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती सरकारकडून केली जात असल्याने लाभार्थ्यांची अचूक नोंद ठेवण्यासाठी NCMC कार्ड बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रियेत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे अनेक पात्र प्रवाशांना पूर्ण भाडे



भरून प्रवास करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने प्रवाशांच्या हिताचा विचार करून ही अट तात्पुरती शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक नितीन मैंद यांनी याबाबतचे आदेश जारी केले असून, १ जानेवारी २०२७ पासून सवलतीसाठी NCMC कार्ड पुन्हा अनिवार्य करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सवलतीच्या प्रवासाची पारदर्शक नोंद ठेवण्यासाठी ही व्यवस्था लागू करण्यात आली आहे. सध्या राज्यभरातील सुमारे ३५०० केंद्रांवर NCMC कार्ड नोंदणी आणि वितरण सुरू असून, ग्रामीण भागातील महिला व इतर लाभार्थ्यांपर्यंत ही सुविधा पोहोचवण्यासाठी विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायतींच्या सहकार्याने ३१ डिसेंबरपर्यंत महिला, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि इतर सर्व पात्र प्रवाशांची १०० टक्के NCMC नोंदणी व कार्ड वितरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट एसटी महामंडळाने ठेवले आहे.

९१ वर्षीय वृद्धेच्या मृत्यूप्रकरणी सुनेला अटक; न्यायालयाकडून पाच दिवसांची पोलीस कोठडी

संगमेश्वर : संगमेश्वर तालुक्यातील नायरी (मुळगावं-फणसवणे) येथील ९१ वर्षीय वृद्ध महिला जुलेखा इसाक मोडक यांच्या मृत्यू प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले आहे. सासूला लाकडी दांडक्याने व हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप असलेल्या सून नाशिरा अस्लम मोडक हिला संगमेश्वर पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने तिला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला आहे.

जिल्हा सत्र न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती श्रीमती एस. वाय. शेख, द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), रत्नागिरी यांनी आरोपी महिलेला पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (BNS) मधील कलम १०३(१), ११८(२), ११८(१) आणि ११५(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ५.३० वाजण्याच्या सुमारास जुलेखा इसाक मोडक यांना त्यांच्या राहत्या घरी मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला होता. वृद्ध सासूची देखभाल करावी लागत असल्याच्या तसेच त्यांना कुठेही फिरायला जाता येत नसल्याच्या कारणावरून सून नाशिरा अस्लम मोडक हिने लाकडी दांडक्याने व हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याची तक्रार होती.

या मारहाणीत जुलेखा मोडक यांच्या उजव्या गुडघ्याला, डाव्या पायाला आणि उजव्या मनगटाला दुखापत झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. याप्रकरणी त्यांची मुलगी जैबुनिसा निजामुद्दीन लांबे (वय ६०, रा. नेरूळ, नवी मुंबई) यांनी संगमेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

दरम्यान, जखमी जुलेखा मोडक यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. वृद्ध महिलेच्या मृत्यूमुळे या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आणि पोलिसांनी संशयित सुनेचा शोध सुरू केला.

वृद्धेच्या मृत्यूनंतर संशयित नाशिरा मोडक गेल्या काही दिवसांपासून पोलिसांना मिळून येत नव्हती. नायरी येथील तिच्या घराच्या पुढील दरवाजाला कडी, तर मागील बाजूला कुलूप असल्याचे निदर्शनास आले होते.

बुधवारी पहाटे पाच वाजल्यापासून संगमेश्वर पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल विनय मनवल यांनी संशयित महिलेचा माग काढण्यास सुरुवात केली. बंद घरात कोणीतरी असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्या ठिकाणी लक्ष ठेवले. त्यानंतर सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास हेड कॉन्स्टेबल विनय मनवल, हेड कॉन्स्टेबल क्रांती सावंत आणि पोलीस हवालदार भोसले यांनी नाशिरा मोडक हिला ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तिला अटक करण्यात आली.

अटकेनंतर आरोपी महिलेला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने तपासाच्या दृष्टीने पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. या कालावधीत पोलिसांकडून मारहाणीची पार्श्वभूमी, घटनेच्या वेळी नेमके काय घडले, तसेच वृद्ध महिलेच्या मृत्यूमागील परिस्थिती याबाबत तपास केला जाण्याची शक्यता आहे.

पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर आरोपी महिलेला सोमवारी देवरुख न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मितेश किणी या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

९१ वर्षांच्या वृद्ध महिलेच्या मारहाणीच्या तक्रारीपासून सुरू झालेले हे प्रकरण आता मृत्यू आणि सुनेच्या अटकेपर्यंत पोहोचले आहे. मात्र, जुलेखा मोडक यांच्या मृत्यूचे नेमके वैद्यकीय कारण काय, कथित मारहाणीचा मृत्यूशी थेट संबंध आहे का आणि या घटनेमागील संपूर्ण वस्तुस्थिती काय आहे, हे पोलीस तपास आणि वैद्यकीय अहवालातून स्पष्ट होणार आहे.



अखेर खेर्डीमध्ये फायर स्टेशनच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात!

● उमेश खताते यांच्या तीन ते चार वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश;
● उद्योगमंत्री उदय सामंत यांचे तत्काळ कार्यवाहीमुळे खेर्डीकरांचे स्वप्न होणार साकार



चिपळूण : खेर्डी गावामध्ये तसेच खेर्डी एमआयडीसी परिसरात वारंवार आगीच्या दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेता, येथे स्वतंत्र फायर स्टेशन उभारण्यात यावे, अशी मागणी युवासेना सरचिटणीस (रायगड-रत्नागिरी लोकसभा) श्री. उमेश खताते यांनी गेल्या तीन ते चार वर्षांपासून सातत्याने लावून धरली होती. यासाठी त्यांनी अनेक वेळा पत्रव्यवहार करून संबंधित मंत्री महोदयांकडे पाठपुरावा केला होता. काही महिन्यांपूर्वी खेर्डी परिसरात आगीची दुर्घटना घडल्यानंतर फायर स्टेशनची आवश्यकता पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवली. त्यानंतर गणपती उत्सवाच्या काळात श्री. उमेश खताते यांनी उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री सन्माननीय श्री. उदय सामंत साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेऊन खेर्डीमध्ये फायर स्टेशन उभारण्याची आग्रही मागणी केली होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत पालकमंत्री तथा उद्योगमंत्री श्री. उदय सामंत साहेब यांनी तत्काळ संबंधित यंत्रणेला आदेश देत खेर्डीमध्ये फायर स्टेशन मंजूर करण्याच्या प्रक्रियेला गती दिली. अखेर फायर स्टेशनला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात फायर स्टेशनच्या उभारणीच्या कामाला सुरुवात झाली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे खेर्डीतील व्यापारी वर्ग, एमआयडीसीमधील उद्योजक, कामगार तसेच खेर्डी आणि आजूबाजूच्या गावांतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. फायर स्टेशनच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याबद्दल खेर्डीतील व्यापारी, उद्योजक आणि नागरिकांनी पालकमंत्री उदय सामंत साहेब यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत. गेल्या तीन ते चार वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करून खेर्डीच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावण्यामध्ये पुढाकार घेतल्याबद्दल श्री. उमेश खताते यांचेही सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. खेर्डीमध्ये फायर स्टेशन उभारले गेल्यानंतर केवळ खेर्डी गावालाच नव्हे, तर संपूर्ण खेर्डी एमआयडीसी, औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक, कामगार आणि आजूबाजूच्या गावांनाही आपत्कालीन परिस्थितीत तातडीने अग्निशमन सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. खेर्डीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आजचा दिवस निश्चितच महत्त्वाचा आणि समाधानाचा ठरणार आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा, लोकहिताची मागणी आणि शासनाच्या सकारात्मक निर्णयातून विकासाचे एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडले आहे. खेर्डीकरांच्या सुरक्षिततेसाठी घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयाबद्दल सन्माननीय पालकमंत्री तथा उद्योगमंत्री श्री. उदय सामंत यांचे मनःपूर्वक आभार!

वीरेंद्र सेहवागच्या लेकाचा धमाका! आर्यवीर सेहवागची १७ चौकार अन् ७ षटकारांसह विक्रमी शतकी खेळी

ओमान : ओमानमध्ये सुरू असलेल्या अंडर-१९ आशिया कप स्पर्धेत वीरेंद्र सेहवागचा मुलगा आर्यवीर सेहवागच्या फलंदाजीची बोलबाला पाहायला मिळाला आहे. नेपाळविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने दमदार अर्धशतक झळकावले होते. त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात तो स्वस्तात माघारी परतला होता. आता यूएईविरुद्धच्या सामन्यात चौकार-षटकारांचा पाऊस पाडून त्याने अंडर-१९ क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले आहे. या खेळात त्याने १६८ चेंडूंचा सामना करत १६० धावा पूर्ण केल्या.

या सामन्यात डावाची सुरुवात करण्यासाठी आलेल्या आर्यवीर सेहवागच्या फलंदाजीत त्याच्या



वडिलांसारख्या फलंदाजीची झलक पाहायला मिळाली. सुरुवातीपासूनच त्याने यूएईच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. यादरम्यान त्याने १३२ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले. हे त्याचे यूथ अंडर-१९ क्रिकेटमधील पहिले शतक ठरले. त्यानंतर १६८ चेंडूंचा सामना करत १६० धावांचा आकडा गाठला.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला चांगली सुरुवात मिळाली होती. पहिल्या विकेटसाठी व्यास राजवंशी आणि आर्यवीर सेहवागने मिळून ६२ धावा जोडल्या. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आर्यवीर आणि वैभव सूर्यवंशी जोडीने मिळून ११० धावांची भागीदारी केली आणि संघाची धावसंख्या २५० पार पोहोचवली. यादरम्यान आर्यवीरने १६८ चेंडूंमध्ये १७ चौकार आणि ७ षटकारांच्या सहाय्याने १६० धावांची विक्रमी खेळी केली.

विक्रमी खेळी करून माघारी परतल्यानंतर भारतीय संघासाठी हा सामना अतिशय महत्त्वाचा ठरला. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने नेपाळवर पाच गडी राखून दमदार सुरुवात केली होती. त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे भारतीय संघाला सेमीफायनलमध्ये प्रवेश करण्याच्या दृष्टीने हा सामना जिंकणे गरजेचे होते.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला चांगली सुरुवात मिळाली होती. पहिल्या विकेटसाठी लक्ष्य राजवंशी आणि आर्यवीर सेहवागने मिळून ६२ धावा जोडल्या. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आर्यवीर आणि बिनोद या जोडीने मिळून १९० धावांची भागीदारी केली आणि संघाची धावसंख्या २५० पार पोहोचवली. यादरम्यान आर्यवीरने १६८ चेंडूंमध्ये १७ चौकार आणि ७ षटकारांच्या साहाय्याने १६० धावांची खेळी केली.

विक्रमी खेळी करून आर्यवीर माघारी परतला. भारतीय संघासाठी हा सामना अतिशय महत्त्वाचा होता. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने नेपाळला पराभूत करून दमदार सुरुवात केली होती. त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे भारतीय संघाला उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी हा सामना जिंकणे गरजेचे होते.

राज्यात दिवसा उन्हाचा चटका, रात्री थंडीचा गारवा; पावसाची शक्यता नाही

मुंबई : राज्यातील हवामानात सध्या संमिश्र बदल जाणवत असून दिवसा उन्हाचा चटका, तर रात्री आणि पहाटे थंडीचा गारवा अनुभवायला मिळत आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) राज्यातील पाचही विभागांमध्ये हवामान कोरडे राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे नागरिकांना सध्या पावसापासून दिलासा मिळणार असला, तरी दिवसा उष्ण आणि दमट वातावरणाचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात १३ नोव्हेंबरच्या आसपास कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. या हवामान प्रणालीमुळे दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पावसाचे संकेत मिळत आहेत. सुरुवातीला कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्यानंतर पुढील २४ तासांत त्याची तीव्रता वाढू शकते. मात्र, त्याचे चक्रीवादळात रूपांतर होईल की नाही, याबाबत अद्याप निश्चितता नाही.



हवामानाच्या विविध मॉडेल्सनुसार या प्रणालीच्या मार्गाबाबत वेगवेगळे अंदाज व्यक्त करण्यात येत आहेत. काही अंदाजांनुसार ही प्रणाली आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीकडे, तर काहींच्या मते म्यानमारच्या दिशेने सरकू शकते. तामिळनाडूतील शिवगंगा, रामनाथपुरम, तुतीकोरीन आणि तिरुनेलवेली जिल्ह्यांसह कावेरी डेल्टा परिसरात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अटल सेतू ते मुंबई-पुणे महामार्ग प्रवास लवकरच अतिजलद होणार

पनवेल : अटल सेतूवरून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वेगाने पोहोचता यावे, यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) ७.३५ किमीचा अटल सेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग असा उन्नत रस्ता बांधला जात आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम तातडीने पूर्ण करून हा उन्नत मार्ग सेवेत दाखल करण्याचे नियोजन एमएमआरडीएचे आहे. हा उन्नत मार्ग सेवेत दाखल झाल्यास दक्षिण मुंबई ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गादरम्यानच्या प्रवासाचा कालावधीही ६० ते ९० मिनिटांनी कमी होईल.

मुंबई ते नवी मुंबई प्रवास अवघ्या १५ ते २० मिनिटांत करता यावा, यासाठी एमएमआरडीएने अटल सेतू बांधला आहे. हा सेतू कार्यान्वित झाल्यापासून मुंबई ते नवी मुंबई प्रवास सुसह्य झाला आहे. तर आता दक्षिण मुंबईहून मुंबई-पुणे



द्रुतगती महामार्गावर अवघ्या काही मिनिटांत पोहोचता यावे, यासाठी एमएमआरडीएने अटल सेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग असा ७.३५ किमीचा सहापदरी उन्नत मार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाचे काम मागील काही वर्षांपासून सुरू आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील कोळखे ते कोन दरम्यान हा उन्नत मार्ग बांधण्यात येत असून, हा मार्ग ११.५ मीटर रुंदीचा आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे एक हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

एसआयआरमुळे २ कोटी मतदार बाद; अहवालातून गंभीर आक्षेप

पवार, पाटील, जाधव, खान, शेख आडनावांची नावे मतदारयादीतून गायब

मुंबई : राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणी (एसआयआर) मोहिमेत २ कोटी ६ लाख ८८ हजार ४२१ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. याचा परिणाम १९० विधानसभा मतदारसंघांवर झाला असून, या मतदारसंघांत वगळलेल्या मतदारांची संख्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील विजयी उमेदवारांच्या मताधिक्यापेक्षा अधिक आहे. पवार, पाटील, जाधव, खान आणि शेख या आडनावांच्या मतदारांची सर्वाधिक नावे वगळल्याचे कोलकात्यातील सबर इन्स्टिट्यूटच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. एसआयआरपूर्वी राज्यात ९.७८ कोटी मतदार होते. वगळलेल्या मतदारांपैकी ८३.२ टक्के जिवंत असून, ४६ टक्के मतदारांचे वय ४० वर्षांपेक्षा कमी आहे. सॉफ्टवेअरमधील तांत्रिक त्रुटींमुळे पात्र मतदारांची नावे वगळली गेल्याचा आरोप सबर इन्स्टिट्यूट या संस्थेने केला आहे. या प्रक्रियेचे सामाजिक लेखापरीक्षण करण्याची मागणी संस्थेचे प्रमुख साबीर अहमद यांनी केली आहे. दरम्यान, हरकती, दावे आणि नव्या नोंदणीसाठी



निवडणूक आयोगाने १६ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. अहवालानुसार, मुंबईत ३४.७ टक्के, ठाण्यात ३५.४ टक्के, तर उर्वरित महाराष्ट्रात १९.५ टक्के मतदारांची नावे वगळली आहेत. पुणे (२८.७ लाख), ठाणे (२८.६ लाख), मुंबई उपनगर (२६.६ लाख), नागपूर (१४.४ लाख) आणि नाशिक (१०.३ लाख) या पाच जिल्ह्यांतून एकूण वगळलेल्या मतदारांपैकी ५२.४ टक्के नावे कमी झाली आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कुलाबा मतदारसंघात २०२४ मध्ये प्रत्यक्ष मतदान केलेल्या १ लाख १८ हजार ४९९ मतदारांपेक्षाही अधिक नावे वगळण्यात आली आहेत. मुंबई, ठाणे, पालघर आणि पुण्यातील आणखी २२ मतदारसंघांत वगळलेल्या नावांचे प्रमाण प्रत्यक्ष मतदानाच्या ७५ ते १०० टक्के आहे. तसेच ९५ मतदारसंघांत अनुपस्थित किंवा शोधता न आलेल्या मतदारांची संख्या विजयी आमदारांच्या मताधिक्यापेक्षा अधिक आहे. मुंबईबाहेर १८ ते २९ वयोगटातील स्थलांतरित म्हणून नोंद असलेल्या ८ लाख २२ हजार ७९८ महिला आणि ३ लाख ७९ हजार ९९१ पुरुषांची नावे वगळली आहेत. महिलांची नावे वगळण्याचे प्रमाण २.२ पट अधिक आहे. विवाहानंतरचे स्थलांतर हे संभाव्य कारण असल्याचा अंदाज अहवालात व्यक्त केला आहे. वगळलेल्या नावांपैकी १४.६ टक्के मुस्लिम मतदारांची आहेत. मुंबई शहरात हे प्रमाण २८.४ टक्के, तर उपनगरात २४.१ टक्के आहे.

मुंबई-पुणे जुना महामार्ग होणार सहा पदरी

रुंदीकरणासाठी सल्लागार नियुक्तीची निविदा प्रसिद्ध

मुंबई : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग दहा पदरी करण्याच्या निर्णयानंतर आता जुन्या मुंबई-पुणे महामार्गाच्या सहा पदरीकरणाची तयारी सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या कामासाठी सल्लागार नियुक्त करण्याकरिता निविदा प्रसिद्ध केली आहे. निगडी ते शिळफाटा या ११०.८ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे सहापदरीकरण आणि सुधारीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठी सुमारे पाच ते सहा हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचा एमएसआरडीसीचा अंदाज आहे.



मुंबई आणि दख्खनच्या पठाराला जोडण्यासाठी ब्रिटिश काळात बोरघाटातून घाटरस्ता विकसित करण्यात आला. पुढे या मार्गाचा राष्ट्रीय महामार्ग म्हणून विकास झाला. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ म्हणून ओळखला जाणारा हा रस्ता यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग सुरू होण्यापूर्वी मुंबई-पुणे प्रवासाचा प्रमुख मार्ग होता. २०१० मध्ये या महामार्गाचा समावेश राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ मध्ये करण्यात आला. सुमारे ११० ते १५६ किलोमीटर लांबीचा हा मार्ग सुरुवातीला दुपदरी होता. वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर त्याचे चौपदरीकरण करण्यात आले.

मात्र, गेल्या काही वर्षांत या मार्गावरील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सध्या दररोज सुमारे ७० हजार वाहने या महामार्गावरून प्रवास करतात. चौपदरी महामार्गाची प्रतिदिन वाहन वाहून नेण्याची क्षमता सुमारे ४० हजार असल्याने वाढत्या वाहतुकीचा ताण रस्त्यावर येत आहे. परिणामी, अनेक ठिकाणी वाहतुकीचा वेग मंदावतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन एमएसआरडीसीने महामार्ग सहापदरी करण्याचा निर्णय घेतला आहे.

सहापदरीकरणाच्या दिशेने पहिले पाऊल टाकत एमएसआरडीसीने सल्लागार नियुक्तीसाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. निगडी ते शिळफाटा या ११०.८ किलोमीटर मार्गाचा सविस्तर आराखडा तयार करण्याची जबाबदारी नियुक्त सल्लागारावर असेल. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २०२७ च्या सुरुवातीला आराखडा तयार करण्याच्या कामाला प्रारंभ करण्याचे नियोजन आहे. आराखडा अंतिम झाल्यानंतर प्रकल्पाचे स्वरूप, आवश्यक बदल आणि प्रत्यक्ष कामाची पुढील प्रक्रिया निश्चित केली जाईल, अशी माहिती एमएसआरडीसीचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली.

विद्यार्थी आत्महत्यांचा गंभीर प्रश्न; महाराष्ट्र देशात आघाडीवर

मुंबई : देशात विद्यार्थी आत्महत्यांच्या घटनांमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (एनसीआरबी) २०२४ च्या अहवालानुसार, देशात वर्षभरात १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी सर्वाधिक २ हजार १०९ घटना महाराष्ट्रात नोंदविण्यात आल्या आहेत. देशातील एकूण विद्यार्थी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा १३.२ टक्के आहे. एनसीआरबीच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये देशात एकूण १ लाख ७० हजार ७४६ आत्महत्यांची नोंद झाली. त्यापैकी १४ हजार



४८८ आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. २०२३ मध्ये ही संख्या १३ हजार ८९२ होती. त्यामुळे एका वर्षात विद्यार्थी आत्महत्यांच्या घटनांमध्ये ४.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे.२०१५ मध्ये ८ हजार १३४ असलेली ही संख्या २०२४ मध्ये १४ हजार ४८८ वर पोहोचली. म्हणजेच दहा वर्षांत विद्यार्थी आत्महत्यांमध्ये ६२.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

दोन दिवसांत फटाक्यांच्या आवाजाच्या मोजक्याच तक्रारी; नवी मुंबई पालिकेच्या आवाहनाला नागरिकांचा अल्प प्रतिसाद

नवी मुंबई : दिवाळीत फटाक्यांमुळे होणारे ध्वनी आणि वायूप्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांनी तक्रारी कराव्यात, असे आवाहन महापालिकेने केले होते. त्यासाठी बेलापूर ते दिघा अशा आठही विभागांचे स्वतंत्र भ्रमणध्वनी क्रमांक, दोन टोल फ्री क्रमांक जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात या तक्रार यंत्रणेला नागरिकांचा अल्प प्रतिसाद मिळाला. त्यातच काही विभागांचे दूरध्वनी क्रमांक बंद, तर काही ठिकाणी फोन उचलले जात नसल्याने तक्रार नोंदवायची तरी कुठे, असा प्रश्न निर्माण झाला. उपलब्ध तक्रारींवर तातडीने कारवाईही होत नसल्याचा अनुभव नागरिकांनी कथन केला.रविवारी (८ नोव्हेंबर) आणि सोमवारी (९ नोव्हेंबर) या दोन दिवसांतील तक्रार यंत्रणेचा आढावा



घेतला असता, महापालिकेच्या आवाहनाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे स्पष्ट झाले. या दोन दिवसांत विभागनिहाय संपर्क साधला असता, दिघा विभागात एकही तक्रार प्राप्त झाली नसल्याची माहिती मिळाली. घणसोली विभागात आठ, तर वाशी विभागात दोन तक्रारी नोंदविण्यात आल्या.नेरुळ विभागात ८ नोव्हेंबरच्या रात्री सर्वाधिक तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यांची संख्या अंदाजे १० ते १२ असल्याचे सांगण्यात आले. बेलापूर विभागात ८ आणि ९ नोव्हेंबर या दोन्ही दिवसांत मिळून सुमारे २० ते २५ तक्रारी प्राप्त झाल्या. मात्र, ऐरोली आणि तुर्भे विभागांच्या जाहीर केलेल्या क्रमांकांवर संपर्क साधला असता फोन उचलण्यात आला नाही. कोपरखैरणे विभागाचा क्रमांक बंद असल्याचे आढळले. त्यामुळे काही विभागांमध्ये तक्रारींची नोंद झाली असली तरी सर्वच विभागांतील यंत्रणेची उपलब्धता आणि प्रतिसादाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागातही या दोन दिवसांत फटाक्यांच्या आवाजामुळे होणाऱ्या त्रासासंदर्भात केवळ दोन तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नवी मुंबईत दिवाळी पाडव्याला प्रदूषणात घट; हवा गुणवत्ता निर्देशांक १३० वर

नवी मुंबई : दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या आतषबाजीमुळे नवी मुंबईतील हवेचा दर्जा खालावला असताना पाडव्याच्या दिवशी प्रदूषणाच्या पातळीत काहीशी घट झाल्याचे चित्र समोर आले आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झालेल्या आतषबाजीनंतर वाढलेला शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक पाडव्याला १३० वर आला. सोमवारी (९ नोव्हेंबर) १६० वर पोहोचलेला निर्देशांक दुसऱ्या दिवशी (मंगळवारी) ३० अंकांनी घसरला. त्यामुळे दिवाळीतील आतषबाजीनंतर पाडव्याला हवेच्या गुणवत्तेत काहीशी सुधारणा झाल्याचे दिसत आहे.

दिवाळीच्या सुरुवातीला शहरातील हवेची गुणवत्ता तुलनेने चांगली होती. नोव्हेंबरच्या पहिल्या दोन दिवसांत शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक अनुक्रमे ९९ आणि ७९ नोंदविण्यात आला होता. त्यानंतर मात्र प्रदूषणाच्या पातळीत वाढ होऊ लागली. दिवाळी जवळ येत असताना फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवेत धूर आणि सूक्ष्म प्रदूषक कणांचे प्रमाण वाढले. ७ नोव्हेंबरला निर्देशांक १४१, ८ नोव्हेंबरला १५४, तर ९ नोव्हेंबरला १६० वर पोहोचला. लक्ष्मीपूजनाच्या काळात झालेल्या



आतषबाजीचा परिणाम हवेच्या गुणवत्तेवर दिसून आला होता. मात्र, पाडव्याच्या दिवशी फटाक्यांची आतषबाजी तुलनेने कमी झाल्याने प्रदूषणाच्या पातळीतही घट नोंदविण्यात आली. १० नोव्हेंबरला शहराचा निर्देशांक १३० वर आला.

शहराची सरासरी सुधारली असली तरी सर्वच भागांतील प्रदूषण कमी झालेले नाही. पाडव्याच्या रात्री १०.०५ वाजताच्या नोंदीनुसार महापे येथे हवा गुणवत्ता निर्देशांक १६६ होता. कोपरीपाडा-वाशी परिसरात १५८, सानपाडा येथे १३८, तर नेरुळमध्ये १३७ निर्देशांकाची नोंद झाली. दुसरीकडे तोंडरे-तळोजा येथे ९३ आणि कळंबोली सेक्टर २ ई येथे १०८ निर्देशांक होता. त्यामुळे महापे आणि वाशी परिसरातील हवेचा दर्जा शहराच्या एकत्रित निर्देशांकापेक्षा खालावलेला असल्याचे दिसून येते. विशेषतः औद्योगिक हालचाली, वाहनांची वर्दळ आणि बांधकामांमधून उडणारी धूळ यांचा या भागांतील प्रदूषणात भर पडत आहे.महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून प्रदूषण नियंत्रणासाठी फॉगिंग यंत्रणा दिवसातून एकाऐवजी तीन वेळा कार्यरत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी पत्रव्यवहार करून आवश्यक उपाययोजना करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. मात्र, धूळ नियंत्रण, रस्त्यांची नियमित स्वच्छता, बांधकामस्थळांवरील नियमांची अंमलबजावणी आणि औद्योगिक उत्सर्जनावर देखरेख या उपाययोजनांनाही प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

जेएनपीटी परिसरात वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा!

महामार्गावर 'यमदूत' उभे; नोकरदार, इतर वाहनचालक बेजार

जेएनपीटी : जेएनपीटी बंदर परिसरातील एमटी कंटेनर यार्डमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. यार्डबाहेर कंटेनर ट्रेलर आणि मालवाहू वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, वाहनचालकांना तब्बल १२ ते २४ तासांपर्यंत वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. ऐन दिवाळीच्या सणासुदीत निर्माण झालेल्या या गंभीर परिस्थितीमुळे कंटेनर चालक, मालवाहतूकदार आणि सामान्य प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

जेएनपीटी बंदर आणि हत्याळा परिसरात मोठ्या संख्येने एमटी कंटेनर यार्ड कार्यरत आहेत. मात्र, या यार्डमध्ये वाहनांची ये-जा करण्यासाठी आवश्यक नियोजन आणि शिस्तीचा अभाव असल्याचे चित्र आहे. बंदर आणि कंटेनर



यार्डमधील व्यवस्थेतील विस्कळीत कारभारामुळे वाहनचालकांना तासन्तास रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. अनेक चालकांना अन्न, पाणी आणि मूलभूत सुविधांपासून वंचित राहून कोंडीत अडकून राहावे लागत असल्याने त्यांना मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

याभोवतीच बिघडलेल्या व्यवस्थापनाचा परिणाम केवळ कंटेनर वाहतूकदारांपुरता मर्यादित राहिलेला नाही. उरण आणि जेएनपीए परिसरातील महामार्ग तसेच अंतर्गत रस्त्यांवर कंटेनरच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. दिवाळीनिमित्त प्रवासासाठी बाहेर पडलेले नागरिक, नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिक यांना या कोंडीचा मोठा फटका बसत आहे.

प्रशासनाच्या मौनावर संताप

एकीकडे वाहनचालक आणि नागरिक तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडलेले असताना जेएनपीए प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

बंदर परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी दूर करून यार्डमधील वाहनांची ये-जा सुरळीत करावी, तसेच सणासुदीच्या काळात विशेष वाहतूक नियोजन करावे, अशी मागणी वाहनचालक, वाहतूकदार आणि संतप्त प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

बंदराचा विकास वेगाने होत असताना रस्त्यांवरील वाहतुकीचा प्रश्न मात्र कायम असल्याने प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्थानिक वाहतूककोंडीची तीव्रता वाढलेली आहे. दिवाळीनिमित्त प्रवासासाठी बाहेर पडलेले नागरिक, नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिक यांना या कोंडीचा मोठा फटका बसत आहे. अपेक्षित वेळेपेक्षा कितीतरी अधिक वेळ प्रवासात खर्च होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

वाहतूक कोंडीमुळे मालवाहतूक व्यवसायाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. कंटेनर वेळेत गंतव्यस्थानी पोहोचत नसल्याने औद्योगिक आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील कामकाजावर परिणाम होत आहे. वाहनांच्या खोळंब्यामुळे इंधनाचा अतिरिक्त खर्च आणि वेळेचे नुकसान यामुळे वाहतूकदारांनाही आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

उरण तालुक्यात जेएनपीटी बंदर, विविध औद्योगिक कंपन्या आणि वाढत्या व्यावसायिक हालचालींमुळे वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बंदराशी संबंधित अवजड वाहने, कंटेनर ट्रेलर, मालवाहू ट्रक आणि खासगी वाहने मोठ्या प्रमाणात रस्त्यांवर असतात.

मात्र, वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांची क्षमता आणि उपलब्ध पायाभूत सुविधा अपुऱ्या पडत आहेत. परिणामी बंदराकडे जाणारे मार्ग, औद्योगिक क्षेत्रातील रस्ते तसेच शहर आणि ग्रामीण भागाला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे.

खारघरमध्ये तरुणाचा मोबाईल हिसकावला!

खारघर : खारघरमध्ये एका २५ वर्षीय तरुणाचा सुमारे दीड लाख रुपये किमतीचा मोबाईल हिसकावून दोन जण काळ्या मोटारसायकलवरून पसार झाल्याची घटना घडली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यश चासकर हा सेक्टर ३५, ओवेगाव पोलिस चौकीजवळील गुप्ता क्लिनिक परिसरात उभा होता. त्यावेळी एका अनोळखी इसमाने त्याला शिवीगाळ करत अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर त्याच्या शर्टच्या खिशातील मोबाईल काढून घेतला.

चोरी केलेला मोबाईल घेऊन आरोपीने आपल्या साथीदारासह काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून प्रशांत कॉर्नरच्या दिशेने पळ काढला. या प्रकरणी खारघर पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

टीव्ही दुरुस्तीच्या दुकानात चोरी

कामोठे : दुकानात काम करणाऱ्या नोकरानेच एलईडी टीव्हीच्या साहित्याचे दीडशे बॉक्स चोरून नेल्याची घटना कामोठे येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी दुकानमालक अमित कुमार शर्मा यांच्या तक्रारीवरून कामोठे पोलिसांनी राजू नारायण मलिक (रा. पटेल नगर, दिल्ली) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अमित कुमार शर्मा यांचे कामोठे सेक्टर ११ येथे किचन केअर सर्व्हिस नावाचे टीव्ही दुरुस्तीचे दुकान आहे. या दुकानात काम करणाऱ्या राजू मलिक याने एलईडी टीव्हीचे कॉफ असलेले सुमारे तीन लाख रुपये किमतीचे दीडशे बॉक्स चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दुकानातील नोकरानेच चोरी केल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त होत आहे.

राज्यातील तंत्रनिकेतनांमध्ये एआयचा वापर अनिवार्य

जानेवारी २०२७ पर्यंत अहवाल सादर करण्याची सूचना

पुणे : तंत्रज्ञानातील वेगवान बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्यांनी सज्ज करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित तंत्रनिकेतने तसेच तंत्रशिक्षण संस्थांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश मंडळाचे सचिव डॉ. मारुती गायकवाड यांनी दिले आहेत. मंडळाने संस्थांना एआय साधनांच्या वापराबाबत विविध सूचना केल्या आहेत. त्यानुसार तंत्रनिकेतनांनी गुगल वर्कस्पेस फॉर एज्युकेशनचा वापर करण्याचा विचार करावा. तसेच संस्थांच्या ई-मेल आयडींच्या माध्यमातून जेमेनी फॉर एज्युकेशन आणि गुगल एआय प्रो फॉर एज्युकेशन यांसारख्या सेवांचा शैक्षणिक कामकाजात समावेश करावा, असे सुचविण्यात आले आहे. अध्यापन, अध्ययन, शैक्षणिक व्यवस्थापन आणि प्रशासकीय कामकाजात एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर मंडळाने भर दिला आहे. एआय साधनांमुळे शिक्षकांना अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य तयार करणे, विषयांचे स्पष्टीकरण देणे आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे अधिक सुलभ होणार आहे. विद्यार्थ्यांनाही विषय समजून घेणे, माहितीचे विश्लेषण करणे आणि स्वतःच्या अध्ययन प्रक्रियेत सुधारणा करणे शक्य होईल. गुगलच्या



सुविधांसोबतच मायक्रोसॉफ्टच्या शैक्षणिक साधनांचाही वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उपलब्धतेनुसार मायक्रोसॉफ्ट ३६५ एज्युकेशन आणि मायक्रोसॉफ्ट कोपायलट यांचा अध्यापन तसेच प्रशासकीय कामकाजासाठी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. या साधनांच्या मदतीने शैक्षणिक नोंदी आणि अहवाल तयार करणे, माहितीचे व्यवस्थापन, शैक्षणिक नियोजन तसेच कार्यालयीन कामकाज अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. शिक्षण क्षेत्रात एआय तंत्रज्ञानामुळे मोठे बदल घडत आहेत. पारंपरिक अध्यापन पद्धतींसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना अधिक वैयक्तिक आणि परिणामकारक शिक्षणाची संधी मिळू शकते. तसेच शिक्षकांचा वेळखाऊ कामांवरील भार कमी होऊन प्रशासकीय कामकाजात वेग आणि अचूकता आणण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे तंत्रनिकेतनांमध्ये एआयचा वापर वाढविण्याचा मंडळाचा निर्णय तंत्रशिक्षणाच्या डिजिटल परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. दरम्यान, या सूचनांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व तंत्रनिकेतन संस्थांनी जानेवारी २०२७ पर्यंत संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावा, असेही मंडळाने स्पष्ट केले आहे.

मंडणगडच्या पाणीप्रश्नावर ऐतिहासिक निर्णय; ४१ कोटी ६९ लाखांच्या नळपाणी योजनेचे भूमिपूजन

मंडणगड :

मंडणगड शहरवासीयांची गेल्या अनेक वर्षांपासूनची पाणीटंचाई आता इतिहासजमा होणार असून शहराच्या विकासात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त 'अमृत २.०' अभियानांतर्गत मंजूर झालेल्या तब्बल ४१ कोटी ६९ लाख रुपये खर्चाच्या भव्य नळपाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते आज झाले. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे मंडणगडची प्रदीर्घ पाण्याची समस्या कायमस्वरूपी सुटणार असून नागरिकांना हक्काचे शुद्ध आणि मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. या सोहळ्यात दूरदृश्यप्रणालीद्वारे



सहभागी होत पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी, राज्यमंत्री योगेश कदम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच नागरिकांना ही दिवाळीची अविस्मरणीय भेट मिळाल्याचे गौरवोद्गार काढले.

भूमिपूजन प्रसंगी मार्गदर्शन करताना महसूल राज्यमंत्री श्री कदम यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत आणि कालमर्यादेबाबत अत्यंत ठाम भूमिका मांडली. मंडणगड ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर झाल्यानंतर शहरात पायाभूत सुविधांचा मोठा अभाव होता, याकडे लक्ष वेधत ते म्हणाले की, सलग अडीच वर्षे केलेल्या पाठपुराव्यामुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने हा निधी खेचून आणला आहे. जलशुद्धीकरण केंद्र व टाकीसाठी आवश्यक असणारी आरोग्य विभागाची जागा मिळण्याबाबतचा चार वर्षांचा तिढाही अवघ्या काही दिवसांत सोडवण्यात आला. उपस्थित कंत्राटदारांना सक्त ताकीद देताना त्यांनी स्पष्ट केले, हे काम मार्च २०२७ पर्यंत दिलेल्या मुदतीतच पूर्ण झाले पाहिजे; गुणवत्तेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही आणि या कामावर प्रशासन व लोकप्रतिनिधींचे थेट बारीक लक्ष राहील.

लोकसेवेचा नवा आदर्श पालकमंत्री डॉ. उदय सामंत हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. ते म्हणाले, एखाद्या लोकप्रतिनिधीने मंत्री झाल्यानंतर आपल्या मतदारसंघाचा कायापालट कसा करावा, याचा वस्तुपाठ दापोली मतदारसंघात पाहायला मिळतो. योगेश कदम हे २४ तास जनतेच्या सेवेत कार्यरत असून थेट कार्यकर्त्यांच्या घरापर्यंत पोहोचून काम करणारे ते राज्यातील आघाडीचे नेते ठरले आहेत. शहरात सुरू असलेल्या या चौफेर विकासकामांमुळे आगामी काळात नगरपंचायतीवर विकासाचा भगवा डौलाने फडकेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

स्वच्छ सर्वेक्षणात रत्नागिरीचा राष्ट्रीय डंका; किनारपट्टी शहरांत देशात तृतीय क्रमांक

रत्नागिरी :

केंद्र सरकारच्यावतीने राबविण्यात आलेल्या 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये रत्नागिरी शहराने राष्ट्रीय स्तरावर उत्तुंग यश संपादन केले आहे. देशातील किनारपट्टीवरील शहरांच्या श्रेणीत (Coastal Cities Category) रत्नागिरी शहराने देशभरात तृतीय क्रमांक पटकावला असून, शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नवी दिल्ली येथे आज झालेल्या एका भव्य आणि दिमाखदार राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. रत्नागिरीच्यावतीने नगराध्यक्ष शिल्पा सुर्वे, मुख्याधिकारी वैभव गारवे, उपनगराध्यक्ष समीर तिवरेकर तसेच पाणी पुरवठा सभापती निमेश नायर, स्वच्छता सभापती राकेश नागवेकर यांनी मंचावर उपस्थित राहून हा गौरव



स्वीकारला.

रत्नागिरी नगरपरिषदेने शहरातील घनकचरा व्यवस्थापन, समुद्रकिनारे व सार्वजनिक परिसराची दैनंदिन स्वच्छता, ओला व सुका कचरा वर्गीकरण आणि प्लास्टिकमुक्तीसाठी सातत्यपूर्ण मोहीम राबवली होती. नगरपालिका प्रशासन, स्वच्छता कर्मचारी यांचे अथक परिश्रम आणि रत्नागिरीकर नागरिकांनी दाखवलेला सक्रिय सहभाग यामुळेच शहर आज राष्ट्रीय स्तरावर सन्मानित झाले आहे.

आसाममध्ये कोलकाता-सैरांग एक्स्प्रेस रुळावरून घसरली; चार प्रवासी जखमी

गुवाहाटी :

आसाममध्ये कोलकाता-सैरांग एक्स्प्रेसला बुधवारी (११ नोव्हेंबर) सकाळी भीषण रेल्वे अपघात झाला. गुवाहाटीजवळील दिगारू रेल्वे स्थानक परिसरात सकाळी ६ वाजून ५४ मिनिटांच्या सुमारास या एक्स्प्रेसचे इंजिन आणि पाच डबे रुळावरून घसरले. या घटनेत चार प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

कोलकात्यातील चितपूर येथून मिझोराममधील सैरांगकडे जाणारी ही गाडी गुवाहाटीहून पुढे निघाल्यानंतर दिगारू स्थानकाजवळ अपघातग्रस्त झाली. दुसऱ्या रेल्वेला मार्ग देण्यासाठी गाडी स्थानकात घेतली जात असताना लोको पायलटला वेगावर नियंत्रण ठेवता आले नाही आणि इंजिनासह पाच डबे रुळावरून घसरल्याची माहिती ईशान्य सीमांत रेल्वेने दिली आहे.

अपघाताच्या वेळी अनेक प्रवासी झोपेत होते. अचानक मोठा आवाज झाल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली. गाडी रुळावरून घसरल्यानंतरही काही अंतर पुढे जात राहिली. पँट्री कार व्यवस्थापकाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी सुमारे एक किलोमीटर पुढे गेल्यानंतर थांबली. या काळात प्रवासी जागेवरून खाली पडले, तर काहींना डब्यांचे दरवाजे उघडण्यात अडचणी आल्या.

अपघातानंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. प्रवाशांना पिण्याचे पाणी, भोजन आणि वैद्यकीय मदत देण्यात आली. सुमारे ८०० प्रवाशांना पर्यायी विशेष गाडीने पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले.दरम्यान, अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यासाठी ईशान्य सीमांत रेल्वेने उच्चस्तरीय चौकशी सुरू केली आहे. लोको पायलटने अपघातापूर्वी केलेल्या व्हिडिओ रेकॉर्डिंगचीही तपासणी केली जात आहे. रेल्वे वाहतूक पूर्ववत झाली असून रुळावरून घसरलेल्या डब्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे.

३४ औषधांच्या किमती निश्चित; कंपन्यांना जादा दर आकारण्यास बंदी

मुंबई :

औषधांच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (एनपीपीए) विविध प्रकारच्या ३४ औषधांच्या किरकोळ किमती निश्चित केल्या आहेत. केंद्रीय रसायने आणि खते मंत्रालयाच्या औषध विभागाने यासंदर्भातील राजपत्रित आदेश प्रसिद्ध केला आहे. यामध्ये अँटिबायोटिक्स, मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब, वेदनाशामक औषधे, डोळ्यांचे थेंब यांसह विविध औषधांचा समावेश आहे.



त्यामुळे संबंधित औषधांच्या किमती निश्चित मर्यादेपेक्षा अधिक आकारण्यावर बंधने आली आहेत. नवीन दरांनुसार, अमॉक्सिसिलिन आणि पोटॅशियम क्लॅव्ह्युलेनेट ओरल सस्पेन्शनची किंमत प्रति मिलीलीटर ५.१० रुपये निश्चित करण्यात आली आहे. सेफ्ट्रियाक्सोन आणि टॅझोबॅक्टम इंजेक्शनच्या एका व्हायलची किंमत १२५.०७ रुपये, तर जेमसिटाबीन इंजेक्शनच्या एका व्हायलची किंमत ५, ६२३.०७ रुपये ठेवण्यात आली आहे. मधुमेहावरील मेटफॉर्मिन आणि सिटाग्लिप्टिनच्या एका गोळीची किंमत १३.९२ रुपये निश्चित केली आहे. मधुमेह आणि हृदयविकाराशी संबंधित औषधांमध्ये मायो-इनॉसिटॉल आणि मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराइडच्या एका गोळीची किंमत २४.४५ रुपये आहे. बिसोप्रोलोल फ्युमरेट, टेल्मिसार्टन आणि सिल्निडिपिनच्या गोळ्यांच्या किमती अनुक्रमे १९.११ आणि २०.८७ रुपये निश्चित करण्यात आल्या आहेत. रोसुवास्टॅटिन, ॲस्पिरिन आणि क्लोपिडोग्रेल यांच्या संयुक्त कॅप्सूलची किंमत घटकांच्या प्रमाणानुसार २५.२१ आणि १६.५६ रुपये ठेवण्यात आली आहे. वेदनाशामक आणि तापावरील औषधांमध्ये इबुप्रोफेन व पॅरासिटामॉल सस्पेन्शनची किंमत प्रति मिलीलीटर ०.६० रुपये, तर पॅरासिटामॉल व मेफेनॅमिक ॲसिड सस्पेन्शनची किंमत ०.९५ रुपये निश्चित केली आहे. डायक्लोफेनॅक सोडियम आणि पॅरासिटामॉलच्या गोळीची किंमत ५.९२ रुपये, पॅरासिटामॉल इंजेक्शनच्या व्हायलची किंमत ३४१.२६ रुपये, तर डायक्लोफेनॅक, मिथाइल सॅलिसिलेट आणि मेंथॉल जेलची किंमत प्रति ग्रॅम ४.०९ रुपये आहे. डोळ्यांच्या औषधांमध्ये सिप्रोफ्लॉक्सासिन व डेक्सामेथासोन आय ड्रॉप्सची किंमत प्रति मिलीलीटर २.७१ रुपये, जेंटामायसिन व डेक्सामेथासोन आय/इअर ड्रॉप्सची १.७५ रुपये, मोक्सीफ्लॉक्सासिन आय ड्रॉप्सची ३५.३७ रुपये आणि मोक्सीफ्लॉक्सासिन व डेक्सामेथासोन आय ड्रॉप्सची २०.४० रुपये निश्चित केली आहे.